दै एकमत

१

# मतदारयादीत नावनोंदणीसाठी रविवारी अर्ज स्वीकारणार

नांदेड : निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार मतदार यादी विशेष पुनरिक्षण कार्यक्रम १६ सप्टेंबर ते २४ ऑक्टोंबर २०१६ पर्यंत जाहीर करण्यात आला आहे. दि.१ जानेवारी २०१७ या आर्हता दिनांकावर ज्या नागरिकाचे वय १८ वर्षे पूर्ण होईल त्यांनी मतदार विहित नमुन्यातील नोंदणी अर्ज संबंधित मतदान केंद्राच्या बीएलओकडे आवश्यक कागदपत्रासह सादर करावा, असे आवाहन तहसिलदार धर्माबाद यांनी केले आहे. या मोहिमेत मतदारांची नोंदणी, दुबार, मयत, स्थलांतरीत मतदारांची वगळणी करणे, छायाचित्रे नसलेल्या मतदारांचे छायाचित्रे अपलोड करण्याचे काम होणार आहे. रविवार १८ सप्टेंबर व १९ ऑक्टोंबर २०१६ रोजी मतदान केंद्रावर बीलओ उपस्थित राहून अर्ज स्विकारणार आहेत. या मोहिमेत जास्तीत जास्त नागरिकांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन प्रभारी तहलिसदार सुनील माचेवाड यांनी केले आहे.

दै लोकमत
५

# मतदारयादीत नावनोंदणी सुरु

नांदेड : निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार मतदारयादी विशेष पूनरिक्षण कार्यक्रम १६ सप्टेंबर ते २४ ऑक्टोबरपर्यंत जाहीर करण्यात आला आहे. १ जानेवारी २०१७ रोजी ज्या नागरिकांचे वय १८ वर्ष पूर्ण होईल, त्यांनी नोंदणी अर्ज संबंधित मतदान केंद्राच्या बीएलओकडे आवश्यक कागदपत्रासह सादर करावा. मोहिमेत मतदारांची नोंदणी, दुबार, मयत, स्थलांतरित मतदारांची वगळणी करणे छायाचित्रे नसलेल्या मतदारांचे छायाचित्र अपलोड होणार आहे. (प्रतिनिधी)

दै लोकपत्र

(1)

# मतदानी नोंदणीसाठी आयुक्तांनी केली जनजागृती

**नांदेड/प्रतिनिधी**

माहे ऑक्टोबर २०१७ मध्ये होणाऱ्या आगामी महापालिका निवडणुकीसाठी मतदार याद्या तयार करण्याचे काम चालू आहे. त्यानुषंगाने मतदार जनजागृती अभियान चालू असून मनपा आयुक्त समीर उन्हाळे यांनी नांदेड शहरातील महाविद्यालयाला भेटी देवून जनजागृती करीत आहेत. तसेच विद्यार्थ्यांना मतदानाच्या हक्कासंदर्भात जनजागृती देखील करीत आहेत.



मतदार जनजागृती अभियान १६ सप्टेंबरपासून महापालिका क्षेत्रांतर्गत प्रभाग निहाय मतदार नोंदणी स्विकृती केंद्र व महाविद्यालयात स्विकृती केंद्र चालू करण्यात आले असून दि. २७ सप्टेंबर रोजी आयुक्त समीर उन्हाळे यांनी नांदेड शहरातील महाविद्यालयाला भेट दिली. मतदार जनजागृती अभियानाची पाहणी केली.

शिवाय विद्यार्थ्यांना मतदार यादीमध्ये नावे टाका म्हणून मार्गदर्शन केले.

मतदानाच्या हक्का संबंधी महत्त्व पटवून दिले. बऱ्याच महाविद्यालयात प्राचार्य व प्राध्यापकासह मतदार जनजागृती संदर्भात चर्चा करून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून मोठ्या प्रमाणात मतदार यादीत नाव नोंदणी करून घेण्याची सूचना केली आहे.

मतदार नोंदणी मोहिम दि. १४ ऑक्टोबरपर्यंत चालू राहणार आहे. सदरील मोहिमेचा विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा व येणाऱ्यामहापालिकानिवडणुकीच्या मतदानापासून वंचित राहू नये असे आवाहनही मनपा आयुक्तांनी केले. प्रभाग निहाय मतदार नोंदणी स्विकृती केंद्राची यादी एनडब्ल्युसीएमसी. जीवोव्ही.ईन या महापालिकेच्या संकेतस्थळावर टाकण्यात आली आहे.

दै पुण्य नगरी

(2)

# महापालिका, जि.प. मतदानासाठी १४ ऑक्टोबरपर्यंत नावे नोंदवा

## राज्य निवडणूक आयुक्तांचे आवाहन

मुंबई : मुंबईसह राज्यातील १५ महानगरपालिका, २६ जिल्हा परिषदा व २९६ पंचायत समित्यांच्या निवडणुकांमध्ये मतदान करण्यासाठी नागरिकांनी १४ ऑक्टोबर २०१६ पर्यंत मतदार यादीत नावे नोंदवावीत; तसेच दुबार, स्थलांतरित व मृत व्यक्तींची नावे वगळावीत, असे आवाहन राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी केले आहे. निवडणूक आयोगाच्या कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

मुंबईसह १० महानगरपालिका, २६ जिल्हा परिषदा व २९६ पंचायत समित्यांची मुदत मार्च-एप्रिलपर्यंत संपत आहे, तर आणखी पाच महानगरपालिकांची मुदत मे व जूनमध्ये संपत आहे. या निवडणुकांमध्ये मतदान करण्यासाठी १ जानेवारी २०१७ रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या तरुण-तरुणींना १४ ऑक्टोबरपर्यंत विधानसभेच्या मतदार यादीत नाव नोंदवण्याची अंतिम संधी आहे. १ जानेवारीच्या अर्हता दिनांकावर आधारित तयार होणारी विधानसभेचीच मतदार यादी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या या निवडणुकांसाठी वापरली जाणार आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगातर्फे १६ सप्टेंबर ते १४ ऑक्टोबर २०१६ या कालावधीत मतदार यादी पुनर्रिक्षण कार्यक्रम राबवला जात आहे. त्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने संबंधित जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्तांना व्यापक प्रमाणावर जनजागृती मोहीम राबवण्याबाबत आदेश दिले आहेत. मतदार यादी पुनर्रिक्षण कार्यक्रमात नवीन मतदारांची नावे नोंदविण्याबरोबरच मतदार यादीतील आपल्या नावाबाबत अथवा पत्त्यातील तपशिलांत दुरुस्ती करावयाच्या असल्यास त्यादेखील करता येतील; तसेच दुबार किंवा आपल्या कुटुंबातील मृत व्यक्तीचे नावदेखील वगळता येईल, असेही त्यांनी सांगितले.

3

## मतदार यादीत नाव नोंदविण्याचे विद्यार्थ्यांना आवाहन

नांदेड (प्रतिनिधी) – ऑक्टोबर २०१७ मध्ये होणाऱ्या आगामी महानगरपालिका निवडणुकीसाठी मतदार यादी अद्यावत करण्याचे काम सध्या चालू आहे. यासाठी मतदार जनजागृती अभियान दि. १६ सप्टेंबरपासून महापालिका क्षेत्रांतर्गत प्रभागनिहाय मतदार नोंदणी स्वीकृत केंद्र व महाविद्यालयात स्वीकृती केंद्र चालू करण्यात आले आहे. दि. २७ सप्टेंबर रोजी आयुक्त महानगरपालिका नांदेड यांनी शहरातील महाविद्यालयांना भेट देऊन मतदार जनजागृती अभियानाची पाहणी करून विद्यार्थ्यांना मतदार यादीत नाव नोंदविण्यासाठी मार्गदर्शन करून मतदानाच्या हक्काचे महत्त्व पटवून दिले.